# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.10.2024** **वार:सोमवार**

---

**आजपासून सुरू होत असलेल्या दीपावलीच्या मंगल पर्वाच्या आमच्या सर्व श्रोत्यांना मनःपूर्वक शुभेच्छा...**

**ठळक बातम्या**

1. देशाला ॲनिमेशनचं जागतिक केंद्र बनवण्याचा संकल्प करण्याचं पंतप्रधानांचं मन की बात मधून आवाहन,
2. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा असल्याचे परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांचे गौरवोद्गार,
3. डिजिटल सुरक्षेबाबत प्रत्येक नागरिकानं जागरुक राहण्याची आवश्यकता असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन आणि
4. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या अखेरचा दिवस; विविध पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा.

**मन की बात**

आजच्या जागतिक अँनिमेशन दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशाला ॲनिमेशनचं जागतिक केंद्र बनवण्याचा संकल्प करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून ते देशवासीयांशी संवाद साधत होते. या कार्यक्रमाचा हा 115 वा भाग होता. देशातलं ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्र झपाट्यानं विस्तारत असून भारत या क्षेत्रात क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं ते म्हणाले. छोटा भीम, ढोलकपूर का ढोल सारख्या ॲनिमेशनपटांची जागतिक स्तरावर भुरळ पाडली असल्याचं सांगितलं. भारतातले तंत्रज्ञ जागतिक स्तरावरच्या निर्मिती संस्थेसमवेत काम करत आहेत, त्यामुळे हे क्षेत्र उद्योग म्हणून प्रस्थापित झालं आहे. आभासी पर्यटन हे उद्योगक्षेत्रही वेगाने प्रसिद्ध होत असून युवा वर्ग त्यामध्ये आघाडीवर असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. येत्या काळात या क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचं ते म्हणाले.

आत्मनिर्भर भारत अभियान न राहाता प्रत्येकानं त्याचा ध्यास घेतल्यानं भारत कोणत्याही क्षेत्रात मागे राहिला नाही. आत्मनिर्भर भारत या संकल्पने अंतर्गत नव्या प्रयत्नांविषयी #AatmanirbharInnovation या हॅशटॅगचा वापर करून लिहिण्याचं त्यांनी नागरिकांना आवाहन केलं.

पंतप्रधानांनी आपल्या कालच्या मन की बात मध्ये 'डिजिटल सुरक्षा' या महत्त्वाच्या विषयावर विस्तारानं चर्चा केली. कोणत्याही कायद्यात डिजीटल अटकेची तरतूद नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. उदाहरणादाखल डिजीटल अटकेशी संबंधित फसवणूकीच्या फोन कॉलचं ध्वनीमुद्रण त्यांनी श्रोत्यांना ऐकवलं, असा फसवा फोन आल्यास तीन टप्प्यांची सुरक्षितता कशी बाळगता येईल हे विस्तारानं सांगताना मोदी म्हणाले....

**मैं आपको डिजिटल सुरक्षा के तीन चरण बताता हूँ। ये तीन चरण हैं- 'रुको-सोचो-एक्शन लो' । कॉल आते ही, 'रुको' – घबराएं नहीं, शांत रहें, जल्दबाजी में कोई कदम न उठाएं, किसी को अपनी व्यक्तिगत जानकारी न दें, संभव हो तो Screenshot लें और Recording जरूर करें । इसके बाद आता है, दूसरा चरण, 'सोचो' । कोई भी सरकारी Agency Phone पर ऐसे धमकी नहीं देती, न ही Video call पर पूछताछ करती है, न ही ऐसे पैसे की मांग करती है-अगर डर लगे तो**

**समझिए कुछ गड़बड़ है। और मैं कहता हूँ तीसरा चरण 'एक्शन' लो। राष्ट्रीय साइबर हेल्पलाइन 1930 डायल करें, cybercrime.gov.in पर रिपोर्ट करें, परिवार और पुलिस को सूचित करें, सबूत सुरक्षित रखें।**

सरदार पटेल, भगवान बीरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्तानं त्यांचे विचार जगासमोर आणण्याचं आवाहन मोदी यांनी देशवासियांना केलं. तसंच कौटुंबिक आरोग्याविषयी सजग राहून 'फिट इंडिया' मोहिम यशस्वी केल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. भारतीय कला, संस्कृती जगभरात लोकांना मंत्रमुग्ध करते, असं सांगून पंतप्रधानांनी विविध देशात भारतीय संस्कृतीवर आधारित होत असलेल्या प्रयोगांची माहिती दिली. दिवाळी, छठपूजा आणि गुरू नानक जयंती या सर्व सणांसाठी शुभेच्छा देतानाच, 'व्होकल फॉर लोकल' हा मंत्र लक्षात ठेवावा, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**जयशंकर-मुंबई**

महाराष्ट्र राज्य भौगोलिकदृष्ट्या गुंतवणुकीला योग्य असल्याची जागतिक उद्योगांची भावना असल्यानं, विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा असल्याचे गौरवोद्गार परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल मुंबईत काढले. मुंबई भाजपा कार्यालयात त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. केंद्र सरकारच्या तिसऱ्या पर्वात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीसाठी समर्पितपणे आणि वेगवान काम सुरू असून त्यासाठी महाराष्ट्राचा विकास वेगाने व्हायला हवा, असंही ते म्हणाले. जागतिक उद्योगक्षेत्र भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक असून भारताविषयी जागतिक स्तरावर विश्वास वाढत असल्याचं हे निदर्शक आहे. जेव्हा राज्य सरकार, केंद्र सरकार एकत्र काम करतात, तेथे उद्योगांची सहाजिकच पहिली पसंती असते, असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

**उमेदवारी अर्ज**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या अखेरचा दिवस आहे; त्यामुळे कालही विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली.

**राष्ट्रवादी तिसरी यादी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं येत्या निवडणुकीसाठी नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये मोहोळमध्ये सिद्धी कदम, परळीत राजेसाहेब देशमुख, चिंचवडमध्ये राहुल कलाटे, भोसरीत अजित गव्हाणे, करंजा विधानसभेसाठी ज्ञायक पटणी, हिंगणघाटमध्ये अतुल वांदिले, हिंगणामध्ये रमेश बंग, अणुशक्तीनगरमध्ये फहाद अहमद, माझलगाव इथं मोहन जगताप आदींना उमेदवारी देण्यात आली आहे.

**उमेदवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं काल उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. यात गेवराईतून विजयसिंह पंडीत, फलटणला सचिन पाटील, निफाडमधून दिलीपकाका बनकर तर पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

शिवसेनेनंही काल 20 उमेदवारांची पुढची यादी जाहीर केली. यामध्ये वरळीमधून मिलिंद देवरा, पुरंदरमधून विजय शिवतारे, कुडाळमधून निलेश राणे, कोल्हापूर उत्तरमधून राजेश क्षीरसागर आणि दिंडोशीमधून संजय निरुपम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

कॉंग्रेसतर्फे काल 14 उमेदवारांची पुढची यादी जाहीर करण्यात आली, यात पुणे कॅटॉनमेंटमधून रमेश बागवे, शिवाजीनगरमधून दत्तात्रय बहिरट तर पंढरपूरमधून भगीरथ भालके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अंधेरी पश्चिममधून या आधीच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु आता या जागेवर अशोक जाधव यांना कॉंग्रेसनं उमेदवारी दिली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे काल 32 उमेदवारांची घोषणा करण्यात आली, आंबेगावमधून सुनील इंदोरे, नाशिक पूर्व मधून प्रसाद सानप यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

**कार्यशाळा**

वार्ताहरांनी बातमीची निष्पक्षता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवावी, असं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल केलं. आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्त विभागाच्या वतीने आयोजित अंशकालीन वार्ताहरांच्या कार्यशाळेत मुंबईत ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून माहिती प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा उपस्थित होत्या. राज्याचे अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, महाराष्ट्र सायबर पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांनी यावेळी मार्गदर्शन केलं.

**लातूर-निवडणूक प्रशिक्षण**

लातूर जिल्ह्यातल्या निलंगा विधानसभा मतदारसंघातल्या 2165 मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं प्रथम प्रशिक्षण काल पार पडलं. यावेळी सहभागी कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष ईव्हीएम हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आलं.

**खडकवासला-प्रशिक्षण**

पुणे जिल्ह्यातही, खडकवासला विधानसभा मतदारसंघात नियुक्त 1 हजार 735 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचं निवडणूक प्रक्रिया प्रशिक्षण देण्या त आलं. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदानाच्या दिवशी करावयाचे मॉक पोल, प्रत्यक्ष कामकाज करताना येणारी आव्हाने आणि घ्यावयाची काळजी, निवडणुकीच्या दिवशी मतदानाच्या वेळी तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास करावयाच्या उपायोजना, अशा सर्व गोष्टींवर यावेळी मार्गदर्शन करण्यात आलं. या प्रशिक्षणादरम्यान मतदान केंद्रावरील पथकांना व्हीव्हीपॅट आणि ईव्हीएमबाबत संपूर्ण माहिती देऊन हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले.

**दिवाळी सुरूवात**

दीपावलीच्या मंगल पर्वाला आज, गुरूद्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ होत आहे. आज, गाय वासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाश कंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लोकांची लगबग दिसून येत आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये अहमदाबाद इथं काल झालेल्या मर्यादित षटकांच्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा 76 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं निर्धारित 50 षटकांत 9 बाद 259 धावा केल्या. हे आव्हान गाठताना भारतीय संघ 48 व्या षटकांत 183 धावांवर सर्वबाद झाला.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.